जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/4329
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग पुणे.
दिनांक :-25/०७/२०१७

प्रति,

जिल्हा परिरक्षक,
शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC), ऑगस्ट- २०१७,
सर्व जिल्हे, व्दारा
शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व / शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प)

**विषय :-** दि.३१/०७/२०१७ रोजीच्या जिल्हा परिरक्षक सहविचार सभेबाबत.
**संदर्भ :-** जी.सी.सी. परीक्षा ऑगस्ट-२०१७ अधिसूचना.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, जी.सी.सी. परीक्षा ऑगस्ट-२०१७ दि.०७,०८,१०,११ व १२ ऑगस्ट-२०१७ च्या दरम्यान महाराष्ट्र व गोवा राज्यात आयोजित करण्यात आली आहे.(दि.०९ ऑगस्ट २०१७ रोजी परीक्षा असणार नाही.)

सदर परीक्षेची पूर्व तयारी व नियोजन करणेच्या संदर्भात जिल्हा परिरक्षक यांची सहविचार सभा दि.३१/०७/२०१७ रोजी वेळ सकाळी ११.०० वाजता परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. सदर सहविचार सभेस मा. श्री.दिनकर पाटील अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे हे मार्गदर्शन करणार आहेत. तरी सदर बैठकीस वेळेवर उपस्थित रहावे.

प्रस्तुत सहविचार सभा ही फक्त जिल्हा परिरक्षक व विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) यांचे प्रतिनिधींसाठीच आहे. दि.३१/०७/२०१७ च्या सहविचार सभेनंतर जिल्हा परिरक्षकांनी या परीक्षेचे जिल्ह्यातील सर्व केंद्रसंचालक व तालुका परीरक्षक यांची सहविचार सभा दि.०२/०८/२०१७ रोजी जिल्हा स्तरावर घेवून परीक्षेच्या संदर्भात सर्व महत्वाच्या सूचना संबंधितांना द्याव्यात.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१

**प्रत कार्यवाहीस्तव,**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) यांना प्रत देवून कळविण्यात येते की, दि.३१/०७/२०१७ रोजीच्या सहविचार सभेसाठी आपले प्रतिनिधी उपस्थित राहणेबाबत आपले स्तरावरुन स्वतंत्र आदेश निर्गमित करावा.
२. जिल्हा शिक्षणाधिकारी (मा.) सर्व व शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प), यांना प्रत देवून कळविण्यात येते की, परिरक्षकांना प्रस्तुत सहविचार सभेस उपस्थित राहणेसाठी कार्यमुक्त करावे.

AUG-2017/DO LETTER